# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### जिल्हा परिषद सांगली अंतर्गत शिक्षण विभागामध्ये मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्त्यांबाबत

**(१) २७१७२ (१८-०७-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद सांगली येथील उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद सांगली या पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्याच्या कार्यकाळात विविध शिक्षण संस्थातील शिक्षकांची पदे ही मागासवर्गीयांसाठी राखीव असताना अनियमितपणे सदर पदावर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्त्या दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर अनियमितपणे केलेल्या नियुक्त्या रद्द केल्या आहेत काय ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील शाळांमधील शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देताना झालेल्या अनियमिततेबाबतची चौकशी आयुक्त शिक्षण यांचे स्तरावर सुरु आहे. चौकशीअंती दोषी आढळणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभग विषयक कारवाईचा प्रस्ताव आयुक्त शिक्षण यांचे मार्फत सादर करण्यात येत आहे.

---

### पिंपळगाव बुद्रुक (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य उप केंद्र व रस्त्याच्या कामाबाबत

**(२) ४३१८७ (१०-०५-२०१६) श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मौजे पिंपळगांव बुद्रुक (ता.कागल, जि.कोल्हापूर) या गावांसाठी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व रस्त्याचे काम मंजूर करण्यांत आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे मंजूर असूनही ती प्रत्यक्षात सुरु न होण्याची कारणे काय आहेत,
(३) उक्त्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
मौजे पिंपळगांव बुद्रुक येथे आरोग्य उपकेंद्र कार्यरत आहे. परंतु, तेथे आरोग्य विभागाकडून रस्त्याचे कोणत्याही प्रकारचे काम जिल्हा नियोजन समितीमधील कोणत्याही आरोग्य विभागाच्या योजनेतून करण्यात आलेले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य शिक्षण बचाव कृती समितीतर्फे राज्य शासनाकडे केलेल्या विविध मागण्याबाबत**

**(३) ४९७६९ (२५-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य शिक्षण बचाव कृती समितीतर्फे राज्य शासनाने विविध निर्णय रद्द व्हावेत या मागण्यासाठी दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ पासून राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, अहमदनगर जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य शिक्षण बचाव कृती समितीने प्रलंबित मागण्यासाठी दोन दिवस शाळा बंद पुकारला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी घेतलेला संच मान्यतेचा निर्णय रद्द करावा वा तसेच अन्य मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने कृती समितीच्या मागण्या मान्य करण्यासंदर्भात निर्णय घेतला आहे काय,
(५) असल्यास,शासनाने सदरच्या प्रलंबित मागण्या पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) होय.
(५) शासनाने दिनांक ८/१/२०१६ व दि. २/७/२०१६ सुधारणा केल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांच्या सेवानिश्चितीबाबत**

**(४) ५४२४८ (२२-०८-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवानिश्चितीस मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा शिक्षणाधिकारी( माध्यमिक) व उपसंचालक यांचेकडून काढून घेऊन शासनाच्या समितीकडे देण्याचा निर्णय शासनाने दिनांक ७ जून २०१६ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यातील ४२ व सोलापूर येथील ५५ शिक्षकांच्या मान्यतेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयात हाडांच्या शस्त्रक्रिया होत नसल्याबाबत**

**(५) ५५३४६ (३०-०८-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयातील हाडाच्या शस्त्रक्रिया मागील तीन महिन्यापासून बंद पडल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी अत्यंत गोर गरीब आदिवासी रुग्ण उपचारासाठी येत असून हाडे जुळवणारी मशीन नादुरुस्त झाल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे हे लक्षात घेता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयातील हाडाच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यक असलेली सी-आर्म मशिन काही कालावधीकरीता बंद होती, तथापि सदर मशिनची दुरुस्ती करण्यात आलेली असून दि. ०७.०६.२०१६ पासून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आलेली आहे. ऑक्टोबर, २०१६ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीत हाडांच्या लहान व मोठया अशा एकूण ९२५ शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मनरेगा योजना योग्यरित्या कार्यान्वित होत नसल्याबाबत**

**(६) ५५४२६ (११-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाला रोजगार हमी योजना या अभिनव संकल्पनेची देणगी देणाऱ्या महाराष्ट्र राज्यात मनरेगा योजना योग्य रित्या कार्यान्वित होत नसल्याने राज्यातील सुमारे ३१ टक्के गावांमध्ये सन २०१५-१६ या वर्षात या योजनेद्वारे निधीचा वापर झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा आढावा घेण्यात आला आहे काय असल्यास त्यात काय आढळून आलेले आहे,

(३) असल्यास, तद्नुसार याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयकुमार रावल (२६-०२-२०१९) :** (१) सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात २८,७०१ ग्राम पंचायतीपैकी ९,०९३ ग्राम पंचायतींमध्ये मगांराग्रारोहयो अंतर्गत "०" खर्च झाला होता. मगांराग्रारोहयो ही मागणी आधारित योजना असून ज्या ठिकाणी मजुरांद्वारे कामाची मागणी केली जाते त्या ठिकाणी संबंधित ग्राम पंचायतींना काम उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे.

(२) व (३) सदर बाबत आढावा घेण्यात आल्यानंतर प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये मागणीप्रमाणे काम सुरु करण्याबाबत निर्देश देण्यात आले. सार्वजनिक कामांसोबत वैयक्तिक लाभार्थ्याला या योजनेतून लाभ देण्यासाठी वैयक्तिक कामे घेण्यात आली त्यामुळे "०" खर्च असणाऱ्या ग्राम पंचायतींची संख्या पुढील प्रत्येक वर्षी कमी झालेली आहे. वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये ४,९६५ ग्राम पंचायती, २०१७-१८ मध्ये २,७६६ ग्राम पंचायती व चालू वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये २,५३४ ग्राम पंचायती मध्ये या योजनेअंतर्गत खर्च "०" होता. ही संख्या वर्ष २०१५-१६ च्या संख्येपेक्षा कमी आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयात तीन नविन ग्रामीण रुग्णालयांना मंजूरी देण्यात आल्याबाबत**

**(७) ५९३१९ (३०-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शासकीय रुग्णालयांतील खाटांच्या जागा वाढल्या असून तीन नविन ग्रामीण रुग्णालयांना मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षे उलटले तरी जागा मिळत नसल्याने यासंदर्भात कोणतीच पुढील कार्यवाही झाली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) होय.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण रुग्णालय किणी, ग्रामीण रुग्णालय जयसिंगपूर व ग्रामीण रुग्णालय, रुकडी या तीन नविन आरोग्य संस्थांना मंजूरी देण्यात आली आहे.

(२) व (३) ग्रामीण रुग्णालय किणी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर करीता जागा उपलब्ध झालेली असून सदर जागा जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर यांच्या नावावर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

रुकडी येथील आरोग्य पथकाची जागा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे नावावर आहे. सदर आरोग्य पथकाची जागा ग्रामीण रुग्णालय बांधणेकरीता जिल्हा शल्यचिकित्सक कोल्हापूर यांना हस्तांतर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

ग्रामीण रुगणालय जयसिंगपूर या नवनिर्मित ग्रामीण रुगणालयाकरीता, सद्या अस्तित्वात असलेल्या प्राथमिक आरोग्य कैंद्र, जयसिंगपूर या जागेची निवड करणेत आली आहे. ग्रामीण रुगणालय बांधण्याकरीता सदर जागा जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर यांचे नावे होण्याबाबतचा प्रस्ताव दि.२७.०१.२०१४ रोजी जिल्हाधिकारी, जि.कोल्हापूर यांना सादर करण्यात आला असून, सदर प्रस्तावाचा पाठपुरावा सुरु आहे.

---

## उल्हासनगर येथील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयाच्या परिसरात बायोमेडिकल वेस्ट कचऱ्याची विल्हेवाट लावली जात असल्याबाबत

**(८) ६०५५७ (३०-०८-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हास नगर येथील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयामध्ये अंबरनाथसह बदलापूर येथील ग्रामीण रुग्ण उपचारासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालय परिसरात जमा होणाऱ्या कचऱ्यात बायोमेडिकल वेस्टसह कचरा जाळला जात असल्याने उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांना त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालय परिसरात कचरा न जाळता डंपिंगवर टाकण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

या रुग्णालयात उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील, अंबरनाथ, बदलापूर या नागरी भागातील तसेच उल्हासनगर लगतच्या मुरबाड, शहापूर, कसारा व कर्जत या ग्रामीण व आदिवासी भागातील रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात.

(२) हे खरे नाही.

माहे मार्च, २०१३ पासून उल्हासनगर महानगरपालिका यांच्यामार्फत निवड केलेल मे.एस.एम.एस. अनमक्लिन ग्रिनटेक प्रा.लि., कल्याण या संस्थेमार्फत मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर मधील बायोमेडीकल वेस्टचा कचरा नियमित पणे घेऊन जात आहेत. त्यामुळे रुग्णालयातील जमा होणारा कचरा बायोमेडीकल वेस्टसह रुग्णालयाच्या परिसरात जाळला जात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) तालुक्यातील महाड ट्रामा केअर हॉस्पिटलच्या दुरावस्थेबाबत**

**(९) ६६११० (१०-०१-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील महाड ग्रामीण रूग्णालय अद्ययावत करतानाच महामार्गावर होणाऱ्या अपघातातील जखमींवर प्राथमिक उपचार व्हावेत यासाठी महाड ट्रामा केअर हॉस्पिटल बांधण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड ट्रामा केअर हॉस्पिटलमध्ये अपुरे तज्ज्ञ डॉक्टर्स, कर्मचारी व उपकरणांचा अभाव असल्यामुळे वेळेवर योग्य ती रूग्णसेवा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जुलै व ऑगस्ट २०१६ मध्ये पडलेल्या पावसामुळे महाड ट्रामा केअर हॉस्पिटलच्या छताला मोठया प्रमाणात गळती लागली असून संपूर्ण हॉस्पिटल जलमय झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) हे अंशत खरे आहे.

महाड ट्रामा केअर युनिट करिता ११ पदे मंजूर असून त्यापैकी ६ पदे भरलेली आहेत. ट्रामा केअर युनिटच्या निकषाप्रमाणे आवश्यक ती यंत्रसामुग्री उपलब्ध असून रुग्णांना गुणात्मक रुग्णसेवा दिली जात आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

ट्रामा केअर युनिटच्या इमारतीमध्ये पावसाची गळतीस प्रतिबंध करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग,महाड यांचेकडून इमारतीवर पत्र्याचे शेडचे बांधकाम करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदवी (ता.माणगाव, जि.रायगड) येथील आरोग्य केंद्रातील असुविधेबाबत**

**(१०) ६६७५१ (१०-०१-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदवी (ता.माणगाव, जि.रायगड) येथील आरोग्य केंद्रात नवीन इमारत बांधलेली असतानाही जुन्या इमारतीमधून सुरु असलेली आरोग्य सेवा, कर्मचाऱ्यांची मोठया प्रमाणात रिक्त असलेली पदे, तसेच इमारतीत पाण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना नसल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच रुग्णालयात प्रसुतिगृह नसल्याने गर्भवतीना हरकोल उपकेंद्रात किंवा माणगाव किंवा श्रीवर्धन येथे उपजिल्हा रुग्णालयात दाखल करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे अशंत: खरे आहे

नांदवी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सन २०१७ पासून नवीन इमारतीत सुरु आहे. नवीन इमारतीसाठी पाणीपुरवठा योजना कार्यरत असून पाणीपुरवठा सुरु आहे. आरोग्य केंद्रातील आकृतीबंधानूसार १५ पदे मंजूर आहेत. त्यामधील ११ पदे भरलेली आहेत व ४ पदे रिक्त आहेत.

(२) हे अशंत: खरे आहे

सदर प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन इमारतीत सुरु होण्यापुर्वी भाडयाच्या इमारतीत सुरु असल्यामुळे माणगांव, श्रीवर्धन व हरकोल उपकेंद्रात प्रसुती कराव्या लागत होत्या.

दि.६.१.२०१७ रोजी नवीन इमारत ताब्यात आल्यामुळे प्रसुती प्रा.आ.केंद्रातच होतात.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील निम्म्याहून अधिक सरकारी माध्यमिक शाळा मुख्याध्यापकाविना सुरु असल्याबाबत**

**(११) ६९३६६ (०५-०१-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निम्म्याहून अधिक शासकीय माध्यमिक शाळा मुख्याध्यापकाविना सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शाळेत मुख्याध्यापकाची नियुक्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राजपत्रित गट ब संवर्गातील पदे मुख्याध्यापक अराजपत्रित गट क मध्ये रुपांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सातारा जिल्ह्यातील जिल्हा सर्वसाधारण रूग्णालयातील गैरकारभाराबाबत

**(१२) ७०७३९ (१०-०१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील जिल्हा सर्वसाधारण रूग्णालयात कर्मचाऱ्यांचा गैरकारभारामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांना जोखमीचे काम तर शासकीय कर्मचाऱ्यांची मुजोरी वाढत असल्याने रूग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत जिल्हा रूग्णालयामध्ये रूग्णांना सोयी-सुविधांऐवजी गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनस्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
अशी कोणतीही तक्रार जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, सातारा यांचेकडे प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तळेरे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील ट्रामाकेअर सेंटर युनिट च्या कामाला तत्काळ सुरवात करण्याबाबत

**(१३) ७१९७५ (१०-०१-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेरे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील ट्रामाकेअर सेटर युनिट मंजूर करुन सुमारे ४ वर्षे झाली असून अद्याप ट्रामा केअर सेंटर कार्यान्वित झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर ट्रामा केअर सेंटर कासार्डे ग्रामिण रुग्णालय येथे व्हावे असे विचारधिन असताना तसेच सदर ठिकाणी हे सेंटर व्हावे अशी मगाणी स्थानिक ग्रामस्थ यांनी मा.आरोग्य मंत्री यांच्याकडे केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास सदर सेटरसाठी लागणारा निधि व आवश्यक पदे निर्माण करण्याची कार्यवाही किती कालावधीत करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) तळेरे येथे ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटरसाठी जागा उपलब्ध होत नसल्याने कासार्डे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेत ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर युनिट सुरु करण्याच्या मागणीबाबत तपासणी करण्यात येत आहे.

---

**राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून शिक्षण हक्क कायदा २००९ आणि शिक्षण शुल्क नियंत्रण कायद्यांचे उल्लंघन होत असल्याबाबत**

**(१४) ७२९८१ (०५-०१-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून शिक्षण हक्क कायदा २००९ आणि शिक्षण शुल्क नियंत्रण कायद्यांचे उल्लंघन होत असल्याने राज्यातील अनेक पालक संघटनांच्या प्रतिनिधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन चर्चा करुन संपूर्ण राज्यात पालकांनी कार्यकारी समिती स्थापन करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने सदर शिक्षण संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-०२-२०१९) :** (१) अशा प्रकारची मागणी किंवा निवेदन आढळून आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भात झालेल्या व्याघ्र्य शिकार प्रकरणांची सीबीआयने पुन्हा चौकशी सुरू केल्याबाबत**

**(१५) ८४९६९ (०४-०९-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात सन २०१३ ते २०१६ या तीन वर्षाच्या काळात ताडोबा, पेंच, यवतमाळचे टिपेश्वर, मेळघाटातील जारिंदा, घंटाग, अकोट, नवेगाव बांध, नागझिरा, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर याठिकाणी किमान १० ते १५ वाघांची शिकार झाली होती, या शिकार प्रकरणाची चौकशी वन विभाग आणि पोलीस विभागाने केली होती मात्र या वाघ शिकारीचे संबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय टोळीसोबत आहेत काय, याची चौकशी करण्यासाठी सीबीआयने पुन्हा व्याघ्र शिकार प्रकरणाची चौकशी सुरू केल्याची माहिती माहे दिंनाक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शासकीय व पालिका रूग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत

**(१६) ८५०७७ (१९-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व पालिका रूग्णालयात सुरक्षा रक्षक नसल्यामुळे रूग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांचा सुरक्षेची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रूग्णालयात सुरक्षा रक्षक नेमण्यासाठी अंदाजे ४६ कोटी रूपये खर्च येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्ताव आरोग्य विभागाने वित्त विभागाकडे अद्यापही पाठवला नसल्याने सुरक्षा रक्षक नेमण्यास विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) आरोग्य संचालनालयाच्या अधिपत्याखालील जिल्हा/उपजिल्हा/ग्रामीण/स्त्री व इतर रुग्णालयामध्ये सुरक्षा रक्षक सेवा देण्यासाठी दि. २७.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये रु. ४९,३७,७६,०००/- रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगर जिल्हयातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिक्षेत्रातील माहिती उपलब्ध करून देण्याबाबत

**(१७) ८५८५३ (२३-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्हयातील उत्तर-पश्चिम व पूर्व परिक्षेत्रात विखुरलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिक्षेत्रातील कान्हेरी गुफा येथील सर्वे क्र. ११ व १२ मधील वानिकी क्षेत्राच्या आरक्षित नियोजित वाहनतळाकरीताच्या प्रस्तावित जागेची माहिती उपलब्ध करून देण्याची, उद्यानाच्या परिक्षेत्रातील नागरिकांना व भोगवटदरांना त्यांच्या आधीन जमाती व तत्सम पारंपारीक वन निवासी आदिवासी बांधवानकरिता यथास्थिती मुख्य वन संरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांनी उल्लेखिलेल्या अनुक्रमे अ,ब,क आणि ड परिक्षेत्राच्या सिमांतिक भूभागांची पडताळणी व केलेल्या प्रक्रियांची माहिती तसेच तेथील ०.९९ एवढ्या हेक्टर क्षेत्रफळावरील वृक्षराजी बाधित होण्याची भीती व त्याबाबतीत केलेल्या प्रक्रियांची माहितीची मागणी स्थानीय सर्वसामान्य नागरिक व जनप्रतिनिधी, नागरी संघटना यांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री (नगरविकास), मुख्य-सचिव, अतिरिक्त मुख्य-सचिव (नगरविकास), महानगरपालिका आयुक्त तसेच त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांच्याकडे दिनांक २६ एप्रिल, २०१७ वा त्या सुमारास केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बृहन्मुंबई महानगरातील उत्तर-पूर्व व पश्चिम परिक्षेत्रातील अनुक्रमे नगरविकास, वानिकी, वन्यप्राणी, पर्यावरण विषयक बाबींवर उपाययोजना गठीत करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,

(३) असल्यास, अशा महानगरपालिका व खासगी संस्थांच्या बाबतीत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०२-२०१९) :** (१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ मौजे कान्हेरी सर्वे क्रमांक ११ व १२ पैकी मध्ये वाहनतळासाठी ०.९९ हे क्षेत्राचा वनेत्तर प्रयोजनासाठी वापर करण्याकरीता केंद्र शासनाने वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत दिनांक १०.०७.२०१५ रोजी काही अटी व शर्तीच्या अधीन राहून तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. सदर वाहनतळ बांधताना कोणत्याही प्रकारची वृक्षतोड करावी लागणार नाही. तसेच सदर क्षेत्रात अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक व निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ अंतर्गत कोणाचाही दावा नाही.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिक्षेत्राच्या सिमातिक भूभागांची अ, ब, क आणि ड अशी वर्गवारी करण्यात आलेली नाही.

प्रस्तावित वाहनतळाच्या ०.९९ हे. एवढया क्षेत्रफळावरील वृक्षराजी बाधीत होत असल्याची तक्रार वन विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील बारा तालुक्यापैकी एकाही तालुक्यात महिला बचत गट विक्री केंद्र (मॉल) सुरु नसल्याबाबत

**(१८) ८७४६३ (२२-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील बारा तालुक्यापैकी एकाही तालुक्यात महिला बचत गट विक्री केंद्र (मॉल) सुरु नसून केवळ इमारतीचे साचे उभारले आहेत तसेच सदरची कामे निधी अभावी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार महिला बचत गट विक्री केंद्राच्या इमारतीचे काम पूर्ण करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) कोल्हापूर जिल्हयामध्ये दिनांक ११.०८.२००९ च्या शासन निर्णयान्वये ११ व दिनांक ०६.०९.२०१२ च्या शासन निर्णयान्वये १ असे एकूण १२ तालुका विक्री केंद्रांना मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्य शासनाकडून प्रत्येकी तालुका विक्री केंद्रास रू. २५.०० लक्ष व स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत मूलभूत सुविधेअंतर्गत प्रत्येकी रू. २५.०० लक्ष मर्यादे पर्यंतचा निधी उपलब्ध करून घेण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर यांनी मागणी केल्याप्रमाणे गगनबावडा, गडहिंग्लज, आजरा, कागल, तुर्केवाडी, बाजारभोगाव, ता. पन्हाळा, व कबनूर, ता. हातकणगंले या ७ तालुका विक्री केंद्राच्या बांधकामाकरीता अतिरिक्त निधी रू. ४३,८२,८३१/- त्याच विक्री केंद्राच्या उपलब्ध व्याजाच्या रक्कमेतून खर्च करण्यास शासन पत्र दिनांक २८.०३.२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी ७ तालुक्यातील अपूर्ण असलेली कामे चालू DSR नुसार व अंतर्गत फर्निचरसह परिपूर्ण होणेकरीता अंदाजे १५४.०० लक्ष इतका निधी आवश्यक असल्याचे दिनांक २०.०४.२०१७ चे पत्रान्वये कळविले आहे.

तालुका विक्री केंद्राच्या बांधकामासंदर्भात मा. मंत्री, ग्रामविकास यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११.०९.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत बांधकाम सुरू असलेल्या कायमस्वरूपी तालुका विक्री केंद्राना अधिकचा आवश्यक निधी उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेण्यात आला. याअनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील अपंग लोकांना बनावट दाखले दिले जात असल्याबाबत**

**(१९) ९६९२६ (०६-०१-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयाचे सही शिक्के वापरुन अपंग लोकांना २ ते १० हजार रुपयांना बनावट दाखले दिले जात असल्याचे प्रकरण माहे ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचे चौकशी करण्याबाबतचे निवेदन उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक व पोलिस निरिक्षक यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कुंभार समाजाच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(२०) १०९३७१ (१९-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुंभार समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी समाजबांधवांनी दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास विधानभवनावर मोर्चा काढून आंदोलन करण्याचा इशारा माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समाजाच्या मागण्या काय आहेत,

(३) असल्यास, कुंभांर समाजाच्या उक्त मागण्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राम शिंदे (२२-०२-२०१९) :** (१) सदर मोर्चाबाबत कुंभार समाजोन्नती मंडळ, पुणे जिल्हा यांचे दिनांक १५.२.२०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२) मागण्या पुढील प्रमाणे आहेत :-

१) कुंभार समाजासाठी संत गोरोबा काका " माती कला बोर्ड"ची स्थापना करावी.

२) महाराष्ट्र शासनाने कुंभार समाजाचा एन.टी. प्रवर्गात समावेश करावा.

३) संत गोरोबा काका यांचे जन्मस्थान तेर ढोकी, जि.उस्मानाबाद या तिर्थक्षेत्रास "अ " दर्जा द्यावा

४) कुंभार समाजाला विधान परिषदेत प्रतिनिधीत्व मिळावे.

५) कुंभार समाजाला मातीवर आकारली जाणारी रॉयल्टी संपुर्णतः माफ करण्यात यावी.

६) माती वाहतुक व वीट भटी परवान्याच्या जाचक अटी रद्द करण्यात याव्यात आणि कुंभार समाजास ओळखपत्रावर परवाना मिळावा.

७) कुंभार समाजासाठी राखीव असणा-या कुंभार खाणीवरील अतिक्रमणे दूर करावीत.

८) कुंभार समाजासाठी वीटा, मुर्ती, मडकी इ.विक्रीसाठी ग्रामपंचायत, नगरपालीका, महापालीका हद्दीत अग्रक्रमाने जागा उपलब्ध करुन द्यावी.

९) कुंभार समाजाला आपल्या मालाच्या उत्पादनासाठी शासकीय जागा उपलब्ध करुन द्यावी.

१०) कुंभार समाजातील साठ वर्षावरील कारागिरास मानधन मिळावे.

११) कुंभार समाजातील विद्यार्थ्यास जिल्हास्तरीय स्वतंत्र वसतिगृहाची उभारणी करावी.

(३) व (४) कुंभार समाजोन्नती मंडळ, पुणे जिल्हा यांचे दिनांक १५.२.२०१८ चे ११ मागण्याचे निवेदन संबधित विभागास पाठवून त्यांचा अहवाल सादर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

---

## रुकडी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे उभारण्यात येणा-या ग्रामीण रुग्णालयास जमिन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२१) १११७३० (०५-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुकडी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे उभारण्यात येणा-या ग्रामीण रुग्णालयास पाच एकर जमीन रयत शिक्षण संस्थेने उपलब्ध करुन द्यावी याकरिता महात्मा गांधी विद्यालयाच्या समोर दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास माजी उपसरपंच यांनी लाक्षणिक उपोषण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार ग्रामीण रुग्णालयास पाच एकर जमीन रयत शिक्षण संस्थेने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५६३ (१५)

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर यांनी रुकडी येथील ग्रामीण रुग्णालयाकरीता, रुकडी, ता.हातकणंगले येथील आरोग्य पथकाची जागा हस्तांतरीत करणेबाबत, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांना वेळोवेळी विनंती केली आहे. तसेच, जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर यांनी मौजे रुकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे ग्रामीण रुग्णालय बांधणेकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दि.२०.१०.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील गिरणा नदी पात्रात बंधारा बांधण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(२२) ११२४४२ (११-०४-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव (जि.जळगांव) शहराच्या पाणी टंचाई निवारणार्थ गिरणा नदी पात्रात कच्चा बंधाऱ्याचे जागी पक्का बंधारा बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजीपासून वारंवार मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्‌वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार गिरणा नदी पात्रात कच्चा बंधा-याचे जागी पक्का बंधारा बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गिरणा नदी पात्रात कच्च्या बंधाऱ्याचे जागी पक्का बंधारा बांधण्यासाठी लघु पाटबंधारे विभाग, जळगाव यांचे मार्फत सर्वेक्षण करण्यात आले असून सदर बंधाऱ्याचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे हे पत्र क्र.३३४६, दि.०४.०८.२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. तसेच सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी,जळगाव यांनी त्यांचे पत्र क्र.टंचाई-२/२०१७/७/५०/१६६७२, दि.३०.१०.२०१७ अन्वये जिल्हा नियोजन अधिकारी, जळगाव यांना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी व प्रशासकीय मान्यता साठी सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी तालुक्यात खाडी किनारी असलेल्या खारफूटीची तोड करुन भरणी करण्यात येत असल्याबाबत

**(२३) ११६३६९ (१२-०४-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यात खाडी किनारी असलेल्या खारफूटीची प्रचंड तोड करुन भरणी होत असून व नागपूर-मुंबई रस्त्यालगतची अनधिकृत बांधकामाची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी पासून वारंवार मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१९) :** (१), (२) व (३) सदर अधिसुचित क्षेत्रातील सी. आर. झेड. बाधित क्षेत्रातील एकूण २२० अनधिकृत बांधकामांप्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावल्या असून, त्यातील ८७ प्रकरणी पोलीस बंदोबस्त मिळणेसाठी पोलीसांना पत्रव्यवहार केला आहे. तसेच ४ प्रकरणी पोलीस बंदोबस्त प्राप्त झाल्याने निष्कासन कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच ०२ प्रकरणी मा.न्यायालयाचे "जैसे थे" आदेश पारीत केले आहेत. उर्वरित प्रकरणी पोलीस बंदोबस्त प्राप्त होताच निष्कासन कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्याचे नियोजित आहे.

सक्षम प्राधिकारी यांची पूर्व परवानगी न घेता व बांधकाम नकाशे मंजूर न करता अनधिकृत सदनिका, गाळे, गोडावूनच्या दस्तांची नोंदणी करण्यात येऊ नये याबाबत दुय्यम निबंधक, भिवंडी यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे. मौजे काल्हेर येथील स.नं.११४ वर अनधिकृत बांधकाम केल्याने मैत्री ग्रुप व अन्य विकासक यांचे विरुध्द दिनांक २३.०२.२०१८ व २४.०२.२०१८ रोजी एकूण १९ गुन्हे जिल्हाधिकारी मार्फत नारपोली पोलीस स्थानकात नोंदविण्यात आले आहेत.

तसेच लोकलेखा समितीसमोर झालेल्या बैठकीमध्ये आदेशीत केल्यानुसार यापुढे या क्षेत्रात अनाधिकृत गोदामांची बाधकामे होऊ नयेत याकरीता उपाययोजना / कार्यवाही करण्याच्या सूचना महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना देण्यात आल्या आहेत=

---

## चेंबुर (मुंबई उपनगर) येथील अमर महल या प्रशासकीय इमारतीच्या दुरुस्तीबाबत

**(२४) ११८१६१ (२०-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार**

**(सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबुर (मुंबई उपनगर) येथील अमर महल या प्रशासकीय इमारतीत शिधावाटप कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, वित्त विभाग, अल्प बचत संचालनालय व इतर अनेक विभागांची कार्यालये कार्यरत असून सदर इमारतीची दुरवस्था झाल्याने इमारत दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) चेंबूर येथील प्रशासकीय कार्यालये २ इमारतींमध्ये असून सदर इमारतींची दुरावस्था झालेली नाही. परंतू, सदर इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने या दोन इमारतींपैकी एका इमारतीचे संरचनात्मक दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सन २०१८-१९ मध्ये दुसऱ्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम हाती घेण्यांत आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोशल मिडीयाच्या माध्यमातून महिला विरोधात अवमानकारक भाष्य करण्यास प्रतिबंध घालण्याबाबत

**(२५) ११८७४२ (२४-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोशल मिडीयाच्या माध्यमातून महिला विरोधात भाष्य व अश्लिल टिप्पणी करणे या बाबींना प्रतिबंध घालण्यासाठी राज्य महिला आयोगाने माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सायबर समितीची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास व राज्य महिला आयोगाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, त्यात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(४) असल्यास, सदर अहवालातील शिफारसींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०२-२०१९) :** (१) होय.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने सायबर समिती दि.१२.०४.२०१८ रोजी गठीत करण्यात आली आहे.

(२) समितीची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी सेविकांनी मानधन वाढीसाठी केलेला संप**

**(२६) १२०००२ (२५-०७-२०१८) श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दोन लाख अंगणवाडी सेविकांनी मानधन वाढीसाठी ११ सप्टेंबर पासून बेमुदत संप पुकारला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या संपकाळात लाखो बालकांना पोषण मिळू न शकल्याने १२५ बालकांचा मृत्यू तसेच सुमारे अडीच हजार कुपोषित बालके आरोग्य विभागाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या मानधन वाढीबाबत केलेल्या मागण्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१९) :**(१) होय खरे आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी मानधन वाढीबरोबर अन्य मागण्याकरिता दि.११/०९/२०१७ ते ०८/१०/२०१७ या कालावधीत काम बंद आंदोलन केले होते.

(२) हे खरे नाही.

(३) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी वरील मानधनात वाढ म्हणून अंगणवाडी सेविका यांना रु.१५००/- ,मिनी अंगणवाडी सेविका - रु.१२५०/- व मदतनीस - रु.१०००/- प्रमाणे वाढ करणेबाबत घोषणा केली आहे, या बाबतचा शासन निर्णय आदेश क्र. एबावि२०१७/ प्र.क्र.१०३/ का.०६ दि.२३/०२/२०१८ अन्वये मानधन वाढ मंजूर करण्यात आलेली आहे. व सुधारीत दराने मानधन आदा करण्यात येत आहे.

(४) लागू नाही.

---

**राज्यात वाढत्या बेरोजगाराच्या समस्येबाबत**

**(२७) १२००६८ (२३-०७-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेरोजगारांचा समस्या गंभीर होत असून नोकरीच्या शोधात असलेल्या १५ ते २९ या वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वाढती बेरोजगारीचा समस्या सोडविण्यासाठी बेरोजगारांना रोजगाराची हमी देणारी सार्वत्रिक रोजगार सुरक्षा योजना राबवून बेकारी दुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे,

सन २०१७ अखेर एकुण ३८.१९ लाख नोंदणी झाल्यापैकी६४ टक्के नोंदणी ही २९ वर्षापर्यंतच्या तरुणांची आहे, हे प्रमाण सन २०१५ मध्ये ६६ टक्के तर सन २०१६ मध्ये ६४ टक्के अशी होती.

(२) राज्यातील बेरोजगारी दूर होण्याच्या दृष्टीने सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार मिळावा म्हणून रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र, प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान तसेच पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना, सुधारित बीज भांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना तसेच स्वयंरोजगारासाठी आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना व गट प्रकल्प कर्ज योजना इ. योजना राबविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चासकमान (ता.खेड, जि.पुणे) प्रकल्पातील कालव्याच्या पोटकालवाच्या खोदकामाबाबत**

**(२८) १२०२१० (२०-०७-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चासकमान (ता.खेड,जि.पुणे) प्रकल्पातील कालव्याच्या पोटकालवा प्रकल्पासाठी भूसंपादन केलेले क्षेत्र वगळून (गट क्र.३४२,३४३) त्यालगत असलेल्या अन्य मालकीच्या क्षेत्रातून(गट क्र.३४१) पोटकालवा खोदण्यात आल्याचा प्रकार मांजरेवाडी-वाजेवाडी (ता.शिरूर) येथे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गट क्र.३४१ मधील बाधित महिलेला कुठलाही मोबदला, जागेची नुकसान भरपाई संबंधित विभागाने दिलेली नसल्याची तक्रार संबंधित महिलेने अन्यायाच्या पहिल्या दिवसापासून अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता, पाटबंधारे शाखा यांचेकडे वारंवार करूनही जलसंपदा विभागाने कोणती ही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन प्रकल्प अधिकाऱ्यांच्या गैरकारभारामुळे गट क्र.३४१ मध्ये संपादन न करताही कालवा खोदण्यात आल्याने संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह बाधित शेतकरी महिलेला जमीन पुन्हा ताब्यात देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर बांधकाम करण्यापूर्वी कार्यकारी अभियंता, चासकमान प्रकल्प विभाग, पुणे यांनी गट क्र.३४०,३४१, ३४२ व ३४३ च्या मालकांचे संमतीपत्र प्राप्त केले आहे. विषयांकित प्रकरणी महिलेचा अर्ज विभागास प्राप्त झाला आहे. सदर भूसंपादन प्रकरण उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.१९, पुणे यांनी दि.१४/०९/२०१८ च्या पत्रान्वये व्यपगत झाले असल्याचे कळविले आहे.

सद्य:स्थितीत शासनाच्या नलिकेद्वारे वितरण प्रणाली धोरणानुसार, भूसंपादन करण्याऐवजी जमिनीखालून बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे सिंचनाची सुविधा निर्माण करणे व अस्तित्वातील कालवे/ वितरीका/ लघुवितरीका बुजवून पूर्ववत करुन देणेचा पर्याय आर्थिकदृष्टया व्यवहार्य असल्याने त्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हयातील मनरेगा अंतर्गत प्रलंबित मजूरी व देयके अदा करण्याबाबत

**(२९) १२०६२९ (२३-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मनरेगा अंतर्गत सन २०१४-१५ चे व त्यापूर्वीचे प्रलंबित मजूरी व देयके अदा करण्याबाबत सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय यांना दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषद, बुलढाणा यांना पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता निधीची तरतूद करुन प्रलंबित मजूरी व देयके अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२६-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रलंबित देयकांच्या प्रदानासाठी मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील नदीपात्रात बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याची झालेली दूरावस्था**

**(३०) १२१२१० (२३-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील नदीपात्रात बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी पध्दतीच्या १२६ बंधा-यापैकी तब्बल ४५ बंधा-यांचे पिलर मोडकळीस आले असून भिंतीना भेगा पडल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधा-यांची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार बंधा-याची दुरुस्ती वा नविन बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) कोल्हापूर सिंचन मंडळांतर्गत एकूण ३४३ को.प.बंधारे आहेत. त्यापैकी २९९ को.प.बंधारे पूर्ण झालेले आहेत. त्यापैकी ५२ को.प.बंधारे नादुरुस्त आहेत. या बंधाऱ्यांची किरकोळ दुरुस्ती सिंचन, बिगरसिंचन पाणीपट्टी वसुलीमधून व विशेष दुरुस्ती, “विस्तार व सुधारणांतर्गत” निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने प्राधान्यक्रम विचारात घेऊन करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात " लिनन " खरेदीत झालेला गैरव्यवहार .**

**(३१) १२१२२० (०६-०८-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात "लिनन" खरेदीत गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार या खरेदीत गैरव्यवहारात केलेल्या संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) लिनन खरेदीत गैरव्यवहार झालेला नसल्याने चौकशी केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आजी-माजी विधिमंडळ सदस्यांना शासकीय कर्मचारी/अधिकारी यांचेकडून सन्मानपूर्वक वागणूक देण्याबाबत

**(३२) १२३६१४ (३०-०७-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसईचे माजी आमदार श्री.डॉमनिक घोन्साल्वीस हे वसई पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षकांना विधायक सूचना करायला गेले असता ती सूचना योग्य पद्धतीने समजून न घेता, उलट त्यांना अवमानकारक वागणूक दिल्याबाबतचे निवेदन माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान माजी आमदारांनी पोलीस अधीक्षक,पालघर यांना दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजी-माजी विधिमंडळ सदस्यांना शासकीय कर्मचाऱ्यांनी/अधिकाऱ्यांनी सन्मानपूर्ण वागणूक देण्यासंदर्भातील शासकीय परिपत्रकातील प्रमुख सूचना कोणत्या आहेत व उक्त परिपत्रके ठराविक काळानंतर शासकीय कर्मचारी/अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत कोणती कार्यपद्धती अनुसरण्यात येत आहे,

(३) तसेच, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१९) :** (१) होय.

(२) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक २७ जुलै, २०१५ चे परिपत्रकामध्ये मा. संसद सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्य यांना सौजन्यपुर्ण वागणुक देण्याबाबत सर्व सरकारी कार्यलयांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच या परिपत्रकातील सुचनांचे/आदेशांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घेणेबाबत सामान्य प्रशासन विभाग दि. १७/०४/२०१७ च्या परिपत्रकान्वये पुन्हा आदेशित केले आहे. अ) विशेषाधिकारभंगाच्या सुचनेसंदर्भात मा. विधानसभा अध्यक्षांनी पोलीस अधिकारी कर्मचारी यांना मा. संसद सदस्य, विधानसभा व विधान परिषद सदस्यांसोबत व्यवहार करतांना ते लोकप्रतिनीधी आहेत याचे व्यवधान बाळगुन त्यांना यथोचित वागणुक देण्यासंदर्भात सुचना देण्यात आल्या आहेत.

ब) संसद सदस्य/ विधानमंडळ सदस्य यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करतांना त्यांना एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे वागणुक न देता कटु प्रसंगी पोलीस अधिकाऱ्यांनी/पोलीस कर्मचाऱ्यांनी कायदेशिर जबाबदारी निभावतांना सन्माननीय सदस्य हे लोकप्रतिनीधी आहेत याचे व्यवधान बाळगुन त्यांची अवहेलना होणार नाही, या दृष्टिने उचित वागणुक द्यावी आणि त्याचे पालन जाणीवपुर्वक व कटाक्षाने करावे.

तसेच सदर सुचना शासकीय कर्मचारी/अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत पालघर जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालये यांना सदरचे परिपत्रक पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांना हजेरीवर सतत चार दिवस वाचून दाखविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(३) श्री. सुनिल माने, पोलीस निरीक्षक यांच्या जबाबनुसार, दिनांक १ मे, २०१८ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रीय ध्वजास सलामी देवून ते त्यांच्या दालनात बसुन महाराष्ट्र दिनानिमित्त व कामगार दिनानिमित्त पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच सफाई कर्मचारी यांना मागविण्यात आलेला अल्पोपहार (जिलेबी) खात होते. त्यांचे प्लेटमध्ये अर्धी जिलेबी बाकी होती व त्यांचा हात जिलेबीच्या पाकाने चिकट झालेला होता. त्याचवेळी माजी आमदार डॉमनिक घोन्साल्वीस यांनी त्यांच्या दालनात प्रवेश केला. त्यावेळी श्री.सुनिल माने, पोलीस निरीक्षक यांनी पोलीस ठाण्याचे इमारतीचे नवीन बांधकाम चालु होत आहे, त्यावेळी पुसट झालेल्या पाटीची दुरुस्ती करुन घेऊ असे त्यांना सांगितले. त्यांनतर माजी आमदार हे जाण्यास निघाले असता त्यांनी श्री. सुनिल माने, पोलीस निरीक्षक यांना त्यांचा हात हातात घेण्याकरिता पुढे केला. परंतु त्यांच्या उजव्या हातास जिलेबीचा पाक लागलेला असल्याने, त्यांनी त्यांचा डावा हात हातात मिळवण्याकरीता पुढे केला. त्यामुळे माजी आमदार यांना दुखविण्याचा त्यांचा कोणताही हेतु नव्हता.माजी आमदार यांना झालेल्या मनस्तापाबाबत त्यांनी दिलगिरी व्यक्त केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी (जि.बीड) तालुक्यात उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(३३) १२४०८५ (२५-०७-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.बीड) तालुक्याची लोकसंख्या सुमारे २५,००० असून येथील रुग्णांना आष्टी येथून ६० कि.मी. अंतरावर असलेल्या अहमदनगर किंवा ८० कि.मी. अंतरावर असलेल्या बीड येथे पुढील तातडीच्या उपचारासाठी जावे लागत असल्याने आष्टी येथे उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीतसेच रहिवाशी यांनी शासनाकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आष्टी तालुक्यात उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यासंबंधी जोडबृहत आराखडा तयार करण्यात येत असून, सदर संस्थेचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी, निकषानुसार जोडबृहत आराखडयामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आंगणेवाडी, बिळवस, भोगलेवाडी येथे नवीन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत**

**(३४) १२६२७३ (३१-०७-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ग्रामपंचायत मसुरे-डांगमोडे चे विभाजन करून आंगणेवाडी, बिळवस, भोगलेवाडी नवीन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ०३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ग्रामपंचायतीचे विभाजन होवून नवीन ग्रामपंचायत स्थापन झाल्यास ग्रामस्थांची गैरसोय दूर होवून ग्रामविकासाच्या विविध योजना संबधित गावात उचित पद्धतीने राबविणे शक्य होणार आहे, हे ही खरी आहे काय,

(३) असल्यास, आंगणेवाडी, बीळवस, भोगलेवाडी गावांसाठी नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१९) :** (१), (२) व (३) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ग्राम पंचायत मसुरे-डांगमोडे चे विभाजन करुन आंगणेवाडी, बिळवस, भोगलेवाडी आणि देऊळवाडा खेरवंद हया नवीन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत दिनांक १८ जुलै, २०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला होता.

शासन निर्णय क्र.व्हीपीएम २६०३/प्र.क्र.१५४४/ पं.रा.४ (२२) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ तसेच, शासन निर्णय क्र.व्हीपीएम २०११/प्र.क्र.१९१/पंरा-४, दिनांक ०४ मार्च, २०१४ मधील सूचना विचारात घेऊन ग्रामपंचायत स्थापनेकरीता भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ च्या खंड (छ) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (सन १९५९ चा अधिनियम ३)कलम ४ अन्वये गाव जाहीर करण्यात येते.

त्यानुषंगाने मसुरे-डांगमोडे ग्रामपंचायतीचे विभाजन होवून मर्डे, बिळवस व देऊळवाडा ही स्वतंत्र गावे असल्याबाबतची दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१८ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांकडे पाठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई-मुंबई शहराला जोडणाऱ्या विक्रोळी-कोपरखैरणे खाडीपुलाबाबत**

**(३५) १२६५६२ (०४-१२-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई मुंबई शहराला जोडणाऱ्या विक्रोळी-कोपरखैरणे खाडीपुलाबाबत सुसाध्यता अहवाल (फिजीबलीटी स्टडी) रिपोर्ट एका खाजगी संस्थेने एमएमआरडीएला सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवाल सादर करूनही अद्याप सदर पुलाच्या कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त खाडी पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१९) :** (१) होय.

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विक्रोळी ते कोपरखैरणे या पुलाकरीता सुसाध्यता अहवाल (फिजीबलीटी स्टडी) तयार करण्याकरीता नियुक्त केलेल्या मे. एन. पी. ब्रीजींग या सल्लागाराकडून सदर पुलासाठीचा अंतिम अहवाल (फायनल रिपोर्ट) नोव्हेंबर, २०१७ मध्ये प्राप्त झाला आहे.

(३) होय, स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर खाडी पुलाची मागणी केली आहे.

(४) व (५) सदर पुलाकरीता आवश्यक त्या परवानग्या, जसे की, पर्यावरणविषयक / सीआरझेड विषयक मान्यता इ. प्राप्त होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर पुलाच्या मुंबई व नवी मुंबई बाजूकडील विकिरण व्यवस्थेसहित (डिस्पर्सल सिस्टीम्स) सदर पुलाकरीता सविस्तर अहवाल (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट- डिपीआर) तयार करण्याकरीता सल्लागाराची नियुक्ती करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियोजन आहे.

पुलाचा सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई वाहतूक पोलीस, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ इत्यादींकडून आवश्यक त्या परवानग्या प्राप्त झाल्यानंतर व प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियोजन आहे.

## राज्यातील वनक्षेत्राधिकारी (आरएफओ) यांच्या नियुक्तीसंदर्भात

**(३६) १२७२१७ (०६-१२-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वनक्षेत्राधिकांऱ्याचा (आरएफओ) निर्धारित परीविक्षाधीन कालावधीचा कार्यक्रम वनविभागाने गेल्या १० वर्षात कधीही यशस्वीरीत्या पूर्ण केलेला नसताना सुध्दा आरएफओंना हा कालावधी पूर्ण केल्याचे बनावट प्रमाणपत्र देऊन नियुक्ती करण्यात आली असल्याचे प्रकरण माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शना आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८ ते २०१८ या कालावधीमध्ये भरती झालेले वनक्षेत्रपाल व सन २०११ ते २०१६ या कालावधीत भरती झालेले सरळसेवा सहायक वनसंरक्षकांनी परिक्षाधीन कालावधीचा अनुक्रमे दीड वर्ष व एक वर्षाचा निर्धारित कार्यक्रम पार पाडलेला नसून मासिक दैनंदिनित सुध्दा त्यांच्या कुठेही नोंदी नसल्याची बाब तसेच सन २००८ ते २०१७ या कालावधीत ३०० पेक्षा जास्त सरळसेवा वनक्षेत्रपालांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०११ ते २०१६ पर्यंत ६० पेक्षा जास्त सहायक वनसंरक्षकांनी हा कार्यक्रम पूर्ण केले नसतांनाही त्यांना यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचे दाखले आणि प्रमाणपत्रे हे सन २००८ पासून वितरित करण्यात येत असल्यामुळे हा प्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाला असून यामध्ये आर्थिक गैरव्यवहार देखील होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सन २००८ ते सन २०१६ या कालावधीत वनविभागात मोठया प्रमाणात वनक्षेत्रपालांची पदे रिक्त असल्याने अधिसंख्य पदे निर्माण न करता रिक्त असलेल्या पदावर सरळसेवेने नियुक्त परिविक्षाधीन वनक्षेत्रपालांना पदस्थापना देण्यात आली आहे. सदर वनक्षेत्रपालांनी नियमित पदाचे कार्यभारासोबत दीड वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केलेला आहे. ज्या अधिकाऱ्यांनी क्षेत्रिय प्रशिक्षणाच्या नोंदी त्यांच्या मासिक दैनंदिनीत घेतलेल्या नाहीत. त्यांच्या बाबतीत प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी दिलेले आहे.

सन २००८ ते २०१८ या कालावधीत वनक्षेत्रपाल या संवर्गामध्ये सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस प्राप्त ३१८ उमेदवार कार्यरत आहेत. त्यापैकी परिविक्षाधीन कालावधी समाप्तीचे निकष पुर्ण करणाऱ्या ७० परिविक्षाधीन वनक्षेत्रपालांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तसेच सन २०११ ते २०१६ या कालावधीत सहायक वनसंरक्षक या संवर्गामध्ये सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस प्राप्त ९२ उमेदवार कार्यरत आहेत. त्यापैकी परिविक्षाधीन कालावधी समाप्तीचे निकष पुर्ण करणाऱ्या ७७ परिविक्षाधीन सहायक वनसंरक्षकांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुरळप (जि.सांगली) येथील वारणा-मोरणा शिक्षण संस्थेच्या निनाई आश्रमशाळेमध्ये मुलींचे लैंगिक शोषण केल्याबाबत**

**(३७) १२७३०५ (०४-१२-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरळप (जि.सांगली) येथील वारणा-मोरणा शिक्षण संस्थेच्या निनाई आश्रमशाळेमध्ये संचालकांनी अल्पवयीन मुलींचे लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पालकांनी व स्थानिकांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास शाळेच्या मुख्याध्यापकांना मारहाण केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात संस्थेचे संचालक श्री. अरविंद पवार व महिला कर्मचारी मनिषा कांबळे यांना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अल्पवयीन मुली या गुन्हयाच्या साक्षीदार असल्याने संचालकांकडुन त्यांना धमकी मिळणे अथवा त्रास देण्यासारखे प्रकार होणार असल्याने त्यांचे संरक्षण व उर्वरीत शिक्षण यांची जबाबदारी घेण्याबाबत निर्णय घेतला आहे काय,
(४) असल्यास, या संस्थेची मान्यता तात्काळ रद्द करुन अनुदान बंद करण्यासह दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०२-२०१९) :** (१) होय, दि.२६/०९/२०१८ रोजी वारणा-मोरणा शिक्षण संस्था संचालित मिनाई प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळा, कुरळप येथे शिकणाऱ्या काही विद्यार्थीनींच्या पालकांनी शाळेचे मुख्याध्यापकांना किरकोळ धक्काबुक्की केली आहे.
(२), (३), व (४) होय, शासन स्तरावरुन सदर आश्रमशाळेवर प्रशासक नेमण्यात आलेला असून सदर संस्थेंतर्गत चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळींतील विद्यार्थ्यीनींना जवळच्या शाळेत सामावून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदरहू आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहर व उपनगरातील मेट्रो प्रकल्पांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३८) १२७३४० (०५-१२-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात सद्यःस्थितीत ३ मेट्रो प्रकल्पांची कामे अपूर्ण अवस्थेत असतांना आणखी वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली मेट्रो-४ व डीएननगर ते मानखुर्द मेट्रो-२-ब असे दोन प्रकल्प व लोखंडवाला-जोगेश्वर-कांजूरमार्ग या मेट्रो-६ प्रकल्पांचे बांधकाम सुरु करण्याचा निर्णय मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वीच्या ३ मेट्रो प्रकल्पाची कामे अपूर्ण असतांना व वाढती वाहतूक कोंडी होत असतांना नवीन मेट्रो रेल्वेची कामे हाती घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात वाढती वाहतूक कोंडी व पादचारी व शाळकरी मुलांना होणाऱ्या त्रासाच्या अनुषंगाने कोणत्या पर्यायी उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१९) :** (१) होय.

(२) मुंबई शहरामध्ये दळणवळणासाठी जरी विविध पर्याय उपलब्ध असले तरी दररोज कार्यालयीन कामकाजासाठी, व्यवसायासाठी व शाळा-कॉलेजात जाण्यासाठी विविध ठिकाणी प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या फार मोठया प्रमाणात वाढलेली आहे. ही वस्तूस्थिती लक्षात घेता, या तिन्ही मेट्रो प्रकल्पांच्या सोबत इतर मेट्रो मार्गिकांची कामे हाती घेण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मेट्रो प्रकल्पाची कामे होत असतांना काही ठिकाणी काही प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे, मात्र मेट्रो ची कामे पूर्ण होऊन ते प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर नागरीकांना जागतीक दर्जाची अत्याधुनिक, आरामदायी व वातानुकूलित प्रवासाची सोय उपलब्ध होणार असून त्यामूळे रस्त्यावरील वाहतूक अधिक सुरळीत सुरु राहण्यास मदत होणार आहे.

(३) मुंबई शहर व उपनगरात होणारी वाढती वाहतूक कोंडी काही प्रमाणात कमी करण्यासाठी शासनाने विविध मेट्रो प्रकल्पाची कामे हाती घेतली आहेत. प्रकल्प बांधकामा दरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीसाठी वाहतूक नियंत्रक (ट्राफिक वार्डन) नियुक्त करणे, पर्यायी वाहतूक वळण मार्ग आखणे, आवश्यकतेनुसार सुचना फलकं लावणे, वाहतूक पोलीस यंत्रणेला अधिक सक्षम बनवण्यासाठी त्यांना आवश्यक सहकार्य करणे, रस्त्यांची डागडूजी करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. पादचारी व शाळकरी विद्यार्थ्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी विविध ठिकाणी पादचारी पूल बांधण्यात आले आहेत व अजूनही काही ठिकाणी असे पादचारी पुल महानगरपालिके मार्फत बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी पादचारी पुल नाही पण रस्ते ओलांडणे आवश्यक आहे, अशा ठिकाणी प्रशिक्षित वाहतूक नियंत्रकामार्फत आवश्यक सहकार्य देण्यात येत आहे. मेट्रो बांधकामासाठी लावण्यात येणाऱ्या दुभाजकावर (बॅरिकेडस) विद्युत दिवे, सौर उर्जेवर चालणारे सोलर फ्लॅशर्स व आवश्यकतेनुसार रस्त्यावर उजेडासाठी पर्यायी एलईडी चे दिवे लावण्यात येत आहे व

गरजेनुसार या सर्व उपाययोजना वाढविण्याचे देखील नियोजन करण्यात आले आहे. ही सर्व कामे स्थानिक महानगरपालिका, वाहतूक पोलीस व इतर संबंधित सर्व यंत्रणांशी समन्वय राखून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करणेबाबत**

**(३९) १२७७१६ (०७-१२-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांतर्गत अंगणवाडया आयएसओ करण्यासाठी कोटयावधी रुपयाचा खर्च शासन करीत असताना आयएसओ मिळालेल्या अंगणवाडयात शिकविणाऱ्या अंगणवाडया सेविका तुटपुंज्या मानधनावर काम करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अंगणवाडी सेविकांना मिळणा-या ७ हजार पर्यंतच्या मानधनात केंद्र शासनाने देशातील अंगणवाडी सेविकांना केलेली दीड हजार रुपयाची वाढ अद्याप करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अंगणवाडी सेविकांनी वाढीव मानधन, रिक्त जागा भरणे,भाऊबीज रक्कम, प्रवास भत्ता, सेवानिवृत्ती नंतर पेन्शन, अतिरिक्त काम न देणे, अंगणवाडीचे भाडे, पिण्याचे पाणी, वजनकाटे, विजेची तरतूद तसेच अंगणवाडी सेविका, मिनी सेविका व मदतनीस यांना प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना, अंगणवाडी कार्यकर्ता बिमा योजना यासाठी संपूर्ण विमा हप्ता केंद्र शासन व एलआयसीकडून भरण्यात याव्यात अशा विविध मागण्यांसाठी दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुंबईत मोर्चा काढल्यानंतर शासनाने माहे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयात याबाबत चर्चेच्या अनुषंगाने निर्णय घेण्याचे आश्वासन देऊनही अद्याप कोणताच निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. ५६३ (३०)

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१९) :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरुस्कृत योजना असून सदर योजनेअंतर्गत अंगणवाड्या चालविण्यात येतात. केंद्र व राज्य शासन यांनी मंजूर केल्याप्रमाणे सेविकांना मानधन देण्यात येत आहे.

(२) मानधनवाढ करण्याबाबत धोरणात्मक निर्णय लवकरच घेण्यात येत आहे.

(३) अंगणवाडी केंद्राना आय.एस.ओ. करण्याची शासनाची योजना नाही व यासाठी आर्थिक तरतूद नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक आदेशानुसार मानधनी कर्मचाऱ्यांना मानधन अदा करण्यात येत आहे.

(४) सदर बाबतीत धोरणात्मक निर्णय झाल्यांनतर कार्यवाही करण्यात येईल.

(५) लागू नाही.

---

**आमगांव (जि.गोंदिया) येथील विविध रस्त्याच्या व पुलाच्या कामांना मान्यता देण्याबाबत**

**(४०) १३०४१२ (३०-११-२०१८). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगांव (जि.गोंदिया) येथील विविध रस्त्याच्या व पुलाच्या कामांना नाबार्ड (२२) अंतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन निधी देण्याबाबत मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक १८ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतीनिधीच्या मागणीनुसार आमगांव विधानसभा क्षेत्रातील विविध रस्त्याच्या व पुलाच्या कामांना मान्यता देऊन निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१९) :** (१) आमगाव विधानसभा क्षेत्रातील पुलांची कामे प्रस्तावित करण्याबाबतचे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दि.५/६/२०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) होय.

(३) नाबार्ड-२२ अंतर्गत प्रस्तावित ३ पुलाच्या कामापैकी एका पुलाच्या कामास नाबार्ड-२३ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त असून कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. उर्वरित दोन ठिकाणी नवीन पूल बांधावयाचे काम हाती घेणे शक्य झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील राहूरी व अकोला येथील कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन दोन नवीन कृषी विद्यापीठाची स्थापन करण्याबाबत**

**(४१) १३१३७४ (१५-१२-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी या विद्यापीठाचे विभाजन करुन धुळे येथे नविन कृषी विद्यापीठ निर्माण व्हावे अशी मागणी शेतकरी व विद्यार्थी संघटनेकडून होत असल्याचे माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचे विभाजन करुन दोन नवीन कृषी विद्यापीठाची स्थापन करण्याकरीता आर्थिक तरतूद करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१९) :** (१) होय, कृषि विद्यापीठ निर्माण कृती समिती, धुळे जिल्हा यांचे दि. २८.२.२०१८ रोजीचे जिल्हाधिकारी, धुळे यांना सादर केलेले निवेदन दि. ५ एप्रिल, २०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) होय, तथापि लोकप्रतिनिधीनी मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांना दि. ९ ऑगस्ट, २०१८ रोजी अर्थसंकल्पिय तरतूद करण्याबाबत निवेदन सादर केले आहे.

(३) अद्याप विद्यापीठ विभाजनाबाबत अंतिम निर्णय झालेला नसल्यामुळे आर्थिक तरतूद करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील सीप्झ ते कुलाबा या मेट्रो मार्ग-३ च्या कामाबाबत**

**(४२) १३१६२१ (०४-१२-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सीप्झ ते कुलाबा या मेट्रो मार्ग-३ या मार्गाचे काम किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(२) असल्यास, या कामावर माहे सप्टेंबर, २०१८ अखेरपर्यंत किती खर्च झाला आहे व त्याचा मूळ अंदाज काय होता,
(३) असल्यास, याबाबत काही वाद उत्पन्न झाला असल्यास, त्याची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१९) :** (१) मुंबई मेट्रो लाईन -३ या प्रकल्पाचे काम डिसेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचा मुंबई मेट्रो रेले कॉर्पोरेशन लिमिटेडचा मानस आहे. याअंतर्गत फेझ-१ (आरे आगार ते वांद्रे - कुर्ला संकुल) - जून, २०२१ पर्यंत व फेझ-२ (वांद्रे-कुर्ला संकुल ते कुलाबा) - डिसेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे एमएमआरसीएलचे नियोजन आहे.
(२) मुंबई मेट्रो लाईन -३ या प्रकल्पाच्या पुर्णत्वास रु.२३,१३६ कोटी इतका खर्च अपेक्षित असून, माहे सप्टेंबर, २०१८ पर्यंत एकूण रु. ६८८१.३ कोटी इतका खर्च झाला आहे.
(३) खर्चाबाबत कोणताही वाद नाही.

---

**सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे विभागीय कृषी संशोधन केंद्रात**
**फॉरेस्ट्री कॉलेज मंजूर करण्याबाबत**

**(४३) १३१७७४ (०४-१२-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ,अकोला यांच्या वतीने विभागीय कृषी संशोधन केंद्रात फॉरेस्ट्री कॉलेज मंजूर करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अप्पर मुख्य सचिव, कृषी विभाग यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंदेवाही येथे फॉरेस्ट्री कॉलेज मंजूर करण्यासाठी लोकप्रतिनिधीनी डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला येथील अधिकाऱ्यांसोबत वारंवार चर्चा करून पाठपुरवठा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी प्राप्त होण्यासाठी सिंदेवाही येथे विभागीय कृषी संशोधन केंद्रात फॉरेस्ट्री कॉलेज मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१९) :** (१) होय. दि.३०.७.२०१८ रोजी लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे.
(२) होय हे खरे आहे.

(३) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला विद्यापीठाच्या कार्यकारी परिषद विषय क्र. ९५/२०१८, ठराव क्र. काप/८७/२०१८, दि. ११.१०.२०१८ नुसार सिंदेवाही येथे फॉरेस्ट्री कॉलेज स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव पारित करुन महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना पुढील कार्यवाहीस्तव व शासनाच्या मंजूरीस्तव सादर करण्यात आलेला आहे. सदरचा प्रस्ताव कृषि परिषदेच्या आगामी बैठकीमध्ये सादर करण्यात येणार आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**ठाणे-भिवंडी बायपास व कल्याण-भिवंडी रस्त्यावरील होणारी वाहतूक कोंडी**

**(४४) १३२१७२ (१०-१२-२०१८). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे-भिवंडी बायपास व कल्याण-भिवंडी रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी माणकोली नाका येथील उड्डाणपुल आणि दुर्गाडी नाका येथे पूल उभारणीचे कामास माहे ऑगस्टनंतर वेग आणण्याचे आदेश आयुक्तांनी कंत्राटदाराला दिले आहे तसेच काम वेगाने न झाल्यास कंत्राटदारावर त्वरीत कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तेसच सदर काम कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) ठाणे-भिवंडी वळणरस्त्यावरील माणकोली व राजणोली येथे उड्डाणपुल बांधण्याचे काम कंत्राटदार मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर (इ) लि. यांना देण्यात आले निविदेतील तरतूदीनुसार ३+३ मार्गिकांचे पूल व दोन्ही बाजूस ७ मीटर रुंदीचे सेवारस्ते व स्लिप रस्त्याचे बांधकाम करणे अंतर्भूत होते. सदर काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ताब्यात असलेल्या ६० मी. रस्त्याच्या रुंदीत पूर्ण होणे शक्य होते. तथापि, सदर कामाची परवानगी देताना ३+३ ऐवजी ४+४ मार्गिकांचे दोन्ही उड्डाणपुल बांधकाम करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामुळे दोन्ही बाजूस ५-५ मी. रुंदीचे अतिरिक्त भूसंपादन करणे आवश्यक ठरले. माणकोली येथील उड्डाणपुलाचे उजव्या बाजूच्या मार्गिकांचे काम पूर्ण करुन त्यावरील दोन्ही दिशेकडील वाहतूक दिनांक ८ एप्रिल, २०१७ रोजी सुरु करण्यात आली आहे.

कामाच्या दिरंगाईमुळे कंत्राटदार मे. सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर (इ) लि. दि. १६/०४/२०१८ रु. ५६०००/- प्रतिदिन इतका दंड आकारण्यास सुरुवात केली आहे. तसेच प्रकल्पाचा राजणोली येथील ४ पदरी उजवीकडील बाजूचे (मुंबई - नाशिक) काम कंत्राटदाराकडून काढून घेण्यात आले असून पुढील कामाची निविदा निश्चितीनंतर ६ महिन्यात काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

दुर्गाडी किल्ल्याजवळील पुलाचे कामास कंत्राटदाराने दिनांक सप्टेंबर, २०१६ मध्ये सुरुवात केले. सदर पुलाच्या प्रस्तावित बांधकामाच्या जमीनीवरील भागासाठी पाईल फाऊंडेशनचे काम पूर्ण झाले असून, पाण्याच्या भागातील पाईल फाऊंडेशन प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या दिनांक ९ मे, २०१७ रोजीच्या सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्रानुसार नौकावहन गाळयांची लांबी वाढवावी लागल्यामुळे प्रस्तावित पुलाच्या संरचनेत बदल करावा लागला. त्यामुळे प्रस्तावित समांतर दुर्गाडी पूलाचे कामास अतिरिक्त कालावधी लागणे अपेक्षित आहे. प्रस्तावित पुलाचे काम हे मे, २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि, सदर पूलाच्या बांधकामासाठी संबंधित आवश्यक असणारी यंत्रसामुग्री व मनुष्यबळ संबंधित कंत्राटदार उपलब्ध करुन देऊ न शकल्यामुळे दिनांक २५.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये दुर्गाडी किल्ल्याजवळील पुल उभारणीच्या कामाच्या कंत्राटदाराचे कंत्राट संपुष्टात (Terminate) आणण्यात आले आहे. नविन कंत्राटदाराची नेमणूक करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून नविन कंत्राटदाराची नेमणूक झाल्यापासून सदर दुर्गाडीपुलाचे काम दिड वर्ष कालावधीच्या आत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**तुमसर-शिवनी (तुमसर शहर) (जि.भंडारा) राज्यमार्गावरील दुभाजकावर रिफ्लेक्टर लावण्याबाबत**

**(४५) १३२५१८ (३०-११-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर-शिवनी (तुमसर शहर) (जि.भंडारा) राज्यमार्गावरील रस्ते दुभाजकावर रिफ्लेक्टर नसल्याने वारंवार अपघात होत असल्याचे गुन्हे तुमसर पोलीस स्टेशनला नोंद होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त राज्यमार्गावरील दुभाजकावर रिफ्लेक्टर लावण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

राज्यसिमा चिंचोली, तुमसर,देवडा साकोली राज्यमार्ग क्र. ३५६ मधील साखळी क्र.२७/२०० ते ३१/८०० लांबी तुमसर शहरातून जात असून सदर लांबीत रस्ते दुभाजक नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायतीच्या नमुना ८ मध्ये कर्जाचा भार नोंद न करण्याच्या निर्णयाबाबत**

**(४६) १३२५२४ (१०-१२-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) ग्रामपंचायतीच्या नमुना ८ मध्ये बँक किंवा पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाचा भार नोंद न करण्याच्या निर्णयाला स्थगिती मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.ग्रामविकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील गरजू खातेदार किंवा कर्जदार हे बँक किंवा पतसंस्थेकडून कर्ज घेण्यापासून वंचित झाले असल्याने खाजगी सावकारांकडून कर्ज घेण्याची परिस्थिती आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) होय,हे खरे आहे.
(२), (३) व (४) ग्रामपंचायत नमुना नं. ८ हा, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील तरतुदींनुसार ग्रामपंचायतींच्या हद्दीतील मालमत्तांवर आकारण्यात येणा-या कराबाबतची नोंदवही असून ग्रामपंचायत नमुना नं.८ मालकी हक्काबाबतचा अधिकारी अभिलेख नाही. सबब, त्यावर कर्जाचा बोजा नोंदविणे कायदेशीररित्या व्यवहार्य ठरणार नाही या विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने दि.६ डिसेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना ग्रामपंचायत नमुना नं.८ वर कर्जाचा बोजा नोंदविता येणार नाही असे कळविण्यात आले आहे. सदरील पत्राला स्थगिती देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांच्या प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने नस्ती सादर करण्यात आली आहे.

---

**पिंपरकणे व म्हाळांदेवी (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील जलसेतूची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(४७) १३२५४७ (०७-१२-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरकणे व म्हाळांदेवी (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील जलसेतूची अपूर्ण कामे पूर्ण करण्याची मागणी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे अकोले येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०२-२०१९) :** (१) होय.

(२) १) राजुर पिंपरकणे उच्च तलांक पूल- या प्रदेशाअंतर्गत निळवंडे-२ धरणाचे बुडीत क्षेत्रातील राजुर पिंपरकणे रस्त्यासाठी प्रवरा नदीवरील उच्च तलांक पुलाचे काम प्रगतीत असून पुलाचे ५४ टक्के काम पूर्ण झाले आहे. सदर पुलाचे सुपरस्ट्रक्चरचे संकल्पन प्राप्त झाले असुन मुल्यार्पणासाठी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ (संकल्पन). नवी मुंबई, यांचेकडे सादर केले आहे.

सद्य:स्थितीत धरणाची पाणी पातळी कमी झाली असून सदर पुलाचे काम सुरु करण्यात येत आहे.

२) म्हाळादेवी जलसेतू सा.क्र. ६७५ मी. - (म्हाळादेवी) सा.क्र.६७५ मी. जलसेतूचे काम प्रगतीपथावर असून ५० टक्के पूर्ण झालेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रामटेक व पारशिवनी (जि.नागपूर) येथील ३ रस्त्यांचा समावेश**
**हायब्रिड ॲन्युईटी योजनेंतर्गत करण्याबाबत**

**(४८) १३३०९८ (३०-११-२०१८) श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक व पारशिवनी (जि.नागपूर) येथील ३ रस्त्यांचा समावेश हायब्रिड ॲन्युईटी योजनेअंतर्गत करण्याबाबतचा तसेच तिन्ही रस्त्यांची एकच निविदा प्रक्रिया काढण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१९) :** (१) नाही.

(२) व (३) प्रस्तुत कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करण्यासाठी एकच डी.पी.आर. सल्लागार नियुक्त करणे ही बाब क्षेत्रीय स्तरावरील असल्याने त्याबाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत शासनाच्या दिनांक २२.१०.२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) तालुक्यातील शेततळ्याच्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(४९) १३३१५२ (३०-११-२०१८). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मागेल त्याला शेततळयासाठी ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते परंतु जत (जि.सांगली) तालुक्यात मुरमाड जमीन असून या अनुदानात शेततळे पूर्ण होत नसल्याने शेततळयाच्या अनुदानात वाढ करण्यात यावी अशी मागणी येथील शेतक-यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने शेततळयाच्या अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२५-०२-२०१९) :** (१) होय.

(२) व ३) विभागाच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये “मागेल त्याला शेततळे” ही योजना अनुदान तत्वावर राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत शेततळ्यांच्या विविध आकारमानांनुसार कमाल रू.५०,०००/- इतके अनुदान देय आहे. अधिकचा खर्च झाल्यास शेतकऱ्याने स्वत: खर्च करणे अनिवार्य राहील.

---

**मौजे पाल (ता.रावेर, जि.जळगांव) येथे उद्यान विद्या महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(५०) १३३७४६ (०७-१२-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाल (ता.रावेर, जि.जळगांव) येथे शासनाने उद्यान विद्या महाविद्यालय सुरु करण्यास मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्यान विद्या महाविद्यालय अद्यापी सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर महाविद्यालय सुरु करण्यासाठी आर्थिक तरतुद करणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त महाविद्यालय कालबध्द कार्यक्रम जाहिर करुन तातडीने सुरु करण्यासह अर्थसंकल्पीय तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५६३ (३८)

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१९)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्नच उद्भवत नाही.
(३) होय हे खरे आहे.
(४) उक्त महाविद्यालयास अद्याप मंजूरी मिळालेली नाही त्यामुळे अर्थसंकल्पीय तरतूद करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.